**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, लेखा विभाग,
क्र. लेखा/०५/कावि/६९०२/२०१७
दिनांक :- १६/०९/२०१७

**विषय:-** वस्तू व सेवा कराची (GST) अंमलबजावणी नंतर शासकीय कंत्राटात होणाऱ्या बदलाबाबत...

**परिपत्रक**

वस्तू व सेवा कराची (GST) अंमलबजावणी दिनांक १ जुलै २०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. सदरच्या अंमलबजावणीमुळे शासकीय कंत्राटावर कराच्या बदललेल्या कररचनेमुळे परिणाम होणार आहे. याबाबत महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्र. जीएसटी -१०१७/प्र.क्र.१५५/कराधान-१, दिनांक : ११ सप्टेंबर, २०१७ च्या परिपत्रकाच्या सुधारित आवृत्तीमध्ये स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

सबब महापालिकेच्या सर्व विभागांनी उपरोक्त शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

16/9

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

जीएसटी अंमलबजावणी नंतर शासकीय
कंत्राटात होणारा बदल.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जीएसटी-१०१७/प्र.क्र.१५५/कराधान-१**
मंत्रालय (विस्तार), हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१७

वाचा : शासन परिपत्रक क्रमांक :जीएसटी-१०१७/प्र.क्र.८१/कराधान-१
दिनांक : १९ ऑगस्ट, २०१७

## परिपत्रक:

जीएसटी ची अंमलबजावणी दिनांक १ जुलै २०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. जीएसटी च्या अंमलबजावणीमुळे शासकीय कंत्राटावर कराच्या बदललेल्या कररचनेमुळे होणाऱ्या परिणामाबद्दल मार्गदर्शक सूचना शासन परिपत्रक क्रमांक जीएसटी-१०१७/ प्र.क्र.८१/ कराधान-१, दिनांक १९ ऑगस्ट २०१७ अन्वये देण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकासंदर्भात शासनाच्या विविध विभागांनी उपस्थित केलेल्या अडचणींसंदर्भात स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

१. दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ चे परिपत्रक शासकीय कार्यकंत्राटा (Works contract) संदर्भात असून, वस्तूच्या पुरवठयाबाबत नाही.

२. संदर्भाधिन परिपत्रकाच्या मुद्दा क्र. २ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे निविदा रद्द करुन पुनःच Short Tender Notice दिल्यास निवीदा प्रक्रियेमध्ये कालपव्य होण्याची शक्यता विभागांनी व्यक्त केली आहे. सदरचा कालपव्यय टाळण्याकरिता विभागाने खालील मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन कंत्राटदाराशी कंत्रटाच्या किंमतीबाबत वाटाघाटी कराव्यात.

**अ.** निविदा दाखल करताना कंत्राटदार त्या दिनांकास अस्तित्वातल्या कराचा दर लक्षात घेऊन कंत्राटाची किंमत Quote करत असतात. निविदा जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर व दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ पूर्वी दाखल केली असल्यास, कंत्राटदाराने जीएसटीचा सर्वसाधारणपणे Construction Service वरील अस्तित्वातल्या कराचा दर एकत्रित १८ टक्के (९% CGST + ९% SGST) लक्षात घेऊन किंमत Quote केली असेल, मात्र सदरचा कराचा दर दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ च्या अधिसूचना क्र. २०/२०१७ Central Tax Rate व २०/२०१७ State २०/२०१७ अन्वये, बहुतश: शासकीय कार्यकंत्राटावर १२% (६% CGST + ६% SGST) झाला आहे. त्यामुळे कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा.

**ब.** निविदा जर दिनांक ०१ जुलै, २०१७ पूर्वी दाखल केली असल्यास कंत्राटदाराने अस्तित्वातल्या VAT प्रमाणे कराचा भार लक्षात घेऊन किंमत Quote केली असेल, मात्र

कंत्राटदाराचे काम ०१ जुलै, २०१७ नंतर पूर्ण होणार असेल तर त्या कामावर जीएसटीची आकारणी होणार आहे. त्यामुळे निविदा सादर करताना वेगळा कर व निविदेबाबत कामावर वेगळ्या कराच्या दराची आकारणी होईल. सदर प्रकारच्या कंत्राटाबाबत जीएसटीपूर्व व जीएसटीनंतरच्या कराचा भार लक्षात घेणे आवश्यक ठरते.

जीएसटीपूर्व व जीएसटीनंतर होणाऱ्या कंत्राटावरील कराच्या भाराबाबत सर्वसाधारणपणे परिगणना कशी करावी हे उदाहरणासह स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. हे फक्त उदाहरण असून, त्यामध्ये बऱ्याच बाबी बाबत गृहितक धरण्यात आले असल्याने विभागांनी सदरचे उदाहरण फक्त संदर्भ म्हणून पहावे.

## Example – Road Contract

| | | |
|---|---|---|
| Road Contract price | - | Rs. 100 |
| Material Component | - | Rs.70 |
| Labour Component | - | Rs. 30 |

**Tax Burden**

| Sr. No. | Material/Service | Percentage in total cost (in material of Rs. 70) | Cost in Rs. | Rate of Duty % | Excise/ Service Tax | Rate of VAT % | VAT |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** |
| 1 | Cement/RMC | 25 | 17.50 | 12 + Rs.120/ M.T. | 2.26 | 13.50 | 2.08 |
| 2 | Stone metal | 25 | 17.50 | - | - | 6.00 | 0.99 |
| 3 | Consumable | 20 | 14 | 14 | 1.09 | 13.50 | 1.66 |
| 4 | Machinery purchase | 10 | 07 | 12.50 | 0.70 | 13.50 | 0.83 |
| 5 | Machinery hire | 10 | 07 | 15 | 0.91 | - | - |
| 6 | Site expenses | 05 | 3.5 | - | - | - | - |
| 7 | Site expenses liable to Service Tax | 05 | 3.5 | 15 | 0.45 | - | - |
| | **Material (Total)** | **-** | **70** | **-** | **-** | **-** | **-** |
| | **labour Component** | **-** | **30** | **-** | **-** | **-** | **-** |
| | **Total** | | **100** | | **6.22** | **-** | **5.56** |

**Presumption** :-

50% cost towards machinery is on account of hiring & 50% towards own purchases.

I. **Contract outside Municipal Corporation area**

A. **Tax Burden pre GST**

| | | |
|---|---|---|
| 5% VAT on Contract Price | - | 5.00 |
| Embedded Excise as per col.6 | - | 6.22 |
| 4% VAT retention on material value of Rs.56 | - | 2.24 |
| GTO to tax ratio in % | - | 13.46% |
| B. **Tax Burden Post GST** | - | 12% |
| a. **Reduction (A – B) after GST** | - | 1.46% |

**II.** **<u>Contract inside Municipal Corporation area</u>**

Material brought inside area of Municipal Corporation was attracting LBT/Octroi which is abolished with introduction of GST, hence, burden will be required to be reduced Post GST.

**A. Tax Burden pre GST**

| | | |
|---|---|---|
| 5% VAT on contract price | - | 5.00 |
| Embedded Excise as per col.6 | - | 6.22 |
| 4% VAT retention on material value of Rs.56 | - | 2.24 |
| LBT/Octroi (on material value of Rs.56) | - | 1.68 |

(Although rate varies Corporation-wise, the average rate of 3% on the material is considered for calculation)

| | | |
|---|---|---|
| GTO to Tax ratio in % | - | 15.14% |
| B. **Tax Burden Post GST** | - | 12% |
| C. **Reduction (A-B) after GST** | - | 3.14% |

३. उपरोक्त मुद्दा क्र. २ ‘अ’ व ‘ब’ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी कमी झालेल्या जीएसटी दराचा तसेच जीएसटीनंतर कमी होणाऱ्या कराचा भार लक्षात घेऊन कंत्राटदाराशी वाटाघाटी करुन कंत्राटासंदर्भात निर्णय घेण्यात यावा.

४. जीएसटी अंमलबजावणीनंतर काही प्रकारच्या On Going कंत्राटात तसेच Work Order दिलेल्या कंत्राटात, कराच्या भारामध्ये वृध्दी वा घट झाल्यामुळे कंत्राटाच्या किंमतीत वृध्दी वा घट होऊ शकते. कंत्राटाच्या किंमतीत करावयाचा बदल कंत्राटामध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तीवर अवलंबून असेल. प्रत्येक कंत्राटाबाबत अटी व शर्ती वेगवेगळया असतील त्यामुळे प्रत्येक विभागाने sample basis वर कंत्राटाच्या copy विधी व न्याय विभागाकडून तपासून बदललेल्या कररचनेमुळे कंत्राटाच्या किंमतीतून कराचा भार कमी झाल्यामुळे वजावट करता येईल किंवा कराचा भार वाढल्यामुळे किंमत वाढवून देता येईल याबाबत अभिप्राय घ्यावेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक २०१७०९१११६३९५९९२०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Dattatraya Bhagat

Digitally signed by Rajendra Dattatraya Bhagat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=332409337d66e27e26c709ba075238b76a2b06f6faffdd035e289bd979cbc844, serialNumber=dab085af545320ae1f04b79f7b024042711c4e23563f67e02ec2daacb3db2c83, cn=Rajendra Dattatraya Bhagat
Date: 2017.09.11 17:33:29 +05'30'

(रा.द. भगत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) प्रधान सचिव/सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड नस्ती, कराधान-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.